दैनिक द वाळवा क्रांती




# रामानंदनगर मध्ये जी- २० Summit India यावर व्याख्यानाचे आयोजन

**दै. वाळवा क्रांती \ किर्लोस्करवाडी**

किर्लोस्करवाडी रामानंदनगर येथे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात लेफ्टनंट संदेश दौंडे जी–२० यावर मार्गदर्शन करतानाकिर्लोस्करवाडी ता.८रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर मध्ये जी- २० Summit India यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

लेफ्टनंट संदेश दौंडे यांनी जी २० समेट इंडिया ची माहिती देताना सांगितले की पहिले जग किंवा तिसरे जग नसून केवळ एक जग असावे असा भारताचा प्रयत्न आहे. एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य याची थीम असणार आहे.प्रा. बि.डी पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले जी २० शिखर परिषद स्थापन करण्यामागील हेतू सांगताना सांगितले, विकसनशील देश व अविकसित देश यांना बरोबरीने घेऊन जाऊन संपूर्ण जगातील गरिबी हटवणे यामागील हेतू आहे असे सांगितले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. यु. व्ही. पाटील, उपप्राचार्या पी. डी.पूदाले, प्रोफेसर डॉ. पी. बी.पाटील,डॉ. एन. एच. कुंभार व एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

Sangli Edition
Sep 9, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

सकाळ
सांगली
शनिवार, ९ सप्टेंबर २०२३

# डॉ. कदम महाविद्यालयात 'जी-२०'वर व्याख्यान

किर्लोस्करवाडी, ता. ८ : रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'जी-२० स्मार्ट इंडिया'वर व्याख्यान झाले.

यावेळी लेफ्टनंट संदेश दौंडे यांनी 'जी-२० समेट इंडिया'बाबत माहिती देताना सांगितले की, एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य ही थीम असणार आहे. बी. डी. पाटील जी २० शिखर परिषद स्थापन करण्यामागील उद्देश सांगताना म्हणाले की, विकसनशील देश व अविकसित देश यांना बरोबरीने घेऊन जाऊन संपूर्ण जगातील गरिबी हटवणे यामागील उद्देश आहे.

या वेळी प्राचार्या डॉ. यू. व्ही. पाटील, उपप्राचार्या पी. डी. पुदाले, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. एन. एच. कुंभार व एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दैनिक द वाळवा क्रांती



# रामानंदनगर मध्ये जी- २० Summit India यावर व्याख्यानाचे आयोजन

**दै. वाळवा क्रांती \ किर्लोस्करवाडी**

किर्लोस्करवाडी रामानंदनगर येथे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात लेफ्टनंट संदेश दौंडे जी–२० यावर मार्गदर्शन करतानाकिर्लोस्करवाडी ता.८रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर मध्ये जी- २० Summit India यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

लेफ्टनंट संदेश दौंडे यांनी जी २० समेट इंडिया ची माहिती देताना सांगितले की पहिले जग किंवा तिसरे जग नसून केवळ एक जग असावे असा भारताचा प्रयत्न आहे. एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य याची थीम असणार आहे.प्रा. बि.डी पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले जी २० शिखर परिषद स्थापन करण्यामागील हेतू सांगताना सांगितले, विकसनशील देश व अविकसित देश यांना बरोबरीने घेऊन जाऊन संपूर्ण जगातील गरिबी हटवणे यामागील हेतू आहे असे सांगितले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. यु. व्ही. पाटील, उपप्राचार्या पी. डी.पूदाले, प्रोफेसर डॉ. पी. बी.पाटील,डॉ. एन. एच. कुंभार व एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

Sangli Edition
Sep 9, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

सकाळ सांगली
शनिवार, ९ सप्टेंबर २०२३

# डॉ. कदम महाविद्यालयात 'जी-२०'वर व्याख्यान

किर्लोस्करवाडी, ता. ८ : रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'जी-२० स्मार्ट इंडिया'वर व्याख्यान झाले.

यावेळी लेफ्टनंट संदेश दौंडे यांनी 'जी-२० समेट इंडिया'बाबत माहिती देताना सांगितले की, एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य ही थीम असणार आहे. बी. डी. पाटील जी २० शिखर परिषद स्थापन करण्यामागील उद्देश सांगताना म्हणाले की, विकसनशील देश व अविकसित देश यांना बरोबरीने घेऊन जाऊन संपूर्ण जगातील गरिबी हटवणे यामागील उद्देश आहे.

या वेळी प्राचार्या डॉ. यू. व्ही. पाटील, उपप्राचार्या पी. डी. पुदाले, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. एन. एच. कुंभार व एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

# पतंगराव कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात

**जनप्रवास । वार्ताहर**

**दुधोंडी :** रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत व प्रेरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यानिमित्त महाविद्यालयातील विविध सोयी-सुविधा तसेच उपक्रमांची माहिती समिती प्रमुखांनी विद्यार्थांना दिली.

यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. यु. व्ही. पाटील यांनी अध्यक्ष मनोगतात महाविद्यालयाच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. तुम्हाला करिअरच्या संधी विविध क्षेत्रात आहेत. त्यासाठी महाविद्यालय सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली.

यानिमित्ताने नवीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभागप्रमुख ए. पी. मुगली यांनी केले. कार्यक्रमाचे आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी आर्ट्स विभागाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले, सायन्स विभागाच्या उपप्राचार्य डॉ. गौरी पाटील, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता.



**रामानंदनगर : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा कार्यक्रमात सहभागी झालेले प्रभारी प्राचार्य डॉ. यु. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले आदी.**

# रामानंदनगरला विद्यार्थ्यांचे स्वागत

सावंतपूर : रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत व प्रेरणा सोहळा उत्साहात झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभागप्रमुख ए. पी. मुगली यांनी केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. यू. व्ही. पाटील यांनी अध्यक्ष मनोगतात प्रगतीचा लेखाजोखा मांडला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी आर्टस् विभागाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले, सायन्स विभागाच्या उपप्राचार्य डॉ. गौरी पाटील, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी आभार मानले.

# डॉ. कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

किर्लोस्करवाडी : रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व प्रेरणा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यानिमित्त महाविद्यालयातील विविध सोयी-सुविधा, तसेच उपक्रमांची माहिती समिती प्रमुखांनी विद्यार्थ्यांना दिली. नवीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने व उत्साहात सहभाग घेतला. ग्रंथालय विभागप्रमुख ए. पी. मुगली यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी प्राचार्य डॉ. यू. व्ही. पाटील यांचे अध्यक्षीय मनोगत झाले. कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले, विज्ञान विभागाच्या उपप्राचार्य डॉ. गौरी पाटील आदी उपस्थित होते.

# डॉ. कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

किर्लोस्करवाडी : रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व प्रेरणा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यानिमित्त महाविद्यालयातील विविध सोयी-सुविधा, तसेच उपक्रमांची माहिती समिती प्रमुखांनी विद्यार्थ्यांना दिली. नवीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने व उत्साहात सहभाग घेतला. ग्रंथालय विभागप्रमुख ए. पी. मुगली यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी प्राचार्य डॉ. यू. व्ही. पाटील यांचे अध्यक्षीय मनोगत झाले. कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले, विज्ञान विभागाच्या उपप्राचार्य डॉ. गौरी पाटील आदी उपस्थित होते.

# पतंगराव कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात

**जनप्रवास । वार्ताहर**

**दुधोंडी :** रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत व प्रेरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यानिमित्त महाविद्यालयातील विविध सोयी-सुविधा तसेच उपक्रमांची माहिती समिती प्रमुखांनी विद्यार्थांना दिली.

यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. यु. व्ही. पाटील यांनी अध्यक्ष मनोगतात महाविद्यालयाच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. तुम्हाला करिअरच्या संधी विविध क्षेत्रात आहेत. त्यासाठी महाविद्यालय सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली.

यानिमित्ताने नवीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभागप्रमुख ए. पी. मुगली यांनी केले. कार्यक्रमाचे आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी आर्ट्स विभागाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले, सायन्स विभागाच्या उपप्राचार्य डॉ. गौरी पाटील, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता.



**रामानंदनगर : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा कार्यक्रमात सहभागी झालेले प्रभारी प्राचार्य डॉ. यु. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले आदी.**

दैनिक द वाळवा क्रांती

# आ. विश्वजित कदम यांच्या हस्ते राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पोस्टर प्रेसेंटेशनचे अनावरण



रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) येथे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पोस्टर प्रेसेंटेशन चे अनावरण करताना महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री मा. आमदार डॉ. विश्वजित कदम साहेब व इतर मान्यवर

**दै. वाळवा क्रांती \ कुंडल**

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर ऑलिम्पिक मेडल प्राप्त भारतीय खेळाडूंचे पोस्टरचे प्रदर्शन भरवण्यात आले.

याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री मा. आमदार डॉ. विश्वजीत कदम साहेब यांनी केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र (आप्पा) लाड, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. जे. के. (बापू) जाधव, प्रभारी प्राचार्या डॉ. यु. व्ही.पाटील, लेफ्टनंट संदेश दौंडे उपस्थित होते. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज्योत प्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. रस्सीखेच, पावसाळी खेळ आट्यापाट्या यांच्या स्पर्धा संपन्न झाल्या. महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने स्पर्धेत सहभागी झाले.राष्ट्रीय खेळाडू नितीन जाधव व रविराज नलवडे इंडियन आर्मी सोल्जर हे उपस्थित होते

Sangli Edition
Sep 1, 2023 Page No. 4

तरुण भारत संवाद

# खेळातून शारीरिक, बौद्धिक विकास

## महेंद्र लाड : चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे सहा विद्यार्थी इंडियन आर्मी, पोलीसमध्ये भरती

प्रतिनिधी
पलूस

विद्यार्थ्यांनी आयुष्यात कोणतातरी एक खेळ जोपासला पाहिजे व तो अंगीकृत केला पाहिजे त्यातून मुलांचा शारीरिक विकास, बौद्धिक विकास, मानसिक विकास घडेल, असे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथाल डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये ते बोलत होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते व पाहुणे सुजय घाडगे होते. ते पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची येथे उपप्राचार्य या पदावर कार्यरत आहे. निसर्गात जे आहे ते आत्मसात केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा क्षेत्रात यश संपादन करून स्वत:ला सिद्ध केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. चालू शैक्षणिक वर्षी २०२३ –२४ मध्ये महाविद्यालयाचे ६ विद्यार्थी इंडियन आर्मी, पोलीसमध्ये भरती झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील २३ प्राध्यापकांनी चालू शैक्षणिक वर्षी राष्ट्रीय, राज्यस्तरावर यश संपादन करून आपला ठसा उंचावलेला आहे. पुरस्कार, पेटंट, लेखन याबद्दल उल्लेखनीय कामगिरी केलेल्यांचा या निमित्त सत्कार करण्यात आला.



पलूसः रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना महेंद्र लाड बाजूस मान्यवर.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. यु.व्ही. पाटील यांनी केले. कार्याध्यक्ष डॉ. पी. बी. पाटील यांनी अहवालाचे वाचन केले. लेफ्टनंट संदेश दौंडे, प्रा. अमोल जमदाडे, मुख्याध्यापिका एम. एस. मोरे, उपप्राचार्य डॉ.के.बी. भोसले, डॉ. गौरी पाटील, सौ. पी. डी. पुदाले, सुपरवायझर एस. एस. खोत उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थी यांचे वाचन प्रा. आशा मडावी, प्रा. नम्रता कांबळे यांनी केले, आभार प्रा. दिनेश ससाने यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम आणि प्रा. संजीवनी शिंदे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

# रामानंदनगर येथे स्कुल कनेक्ट अभियान

**जनप्रवास । दुधोंडी**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्कूल कनेक्ट अभियान राबविण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाने नेमून दिलेल्या विविध कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यामंदिर कन्या कनिष्ठ महाविद्यालय आरग, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तासगाव, डॉ. पतंगराव कदम माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय कुंडल तसेच डॉ. पतंगराव कदम ज्युनिअर कॉलेज रामानंदनगर येथे बारावीच्या ३०० विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात होणाऱ्या बदलांविषयी प्रबोधन करण्यात आले.

सदर कार्यशाळेसाठी प्रा. स्नेहा वाघ , प्रा. शुभांगी लवटे, प्रा. डॉक्टर अमोल कांबळे, प्रा. सुशेन कांबळे उपस्थित होते.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# खेळातून शारीरिक, बौद्धिक, विकास : लाड

**पलूस: पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी आयुष्यात कोणतातरी एक खेळ तरी जोपासला पाहिजे. त्यातून मुलांचा शारीरिक विकास, बौध्दिक, मानसिक विकास घडेल, असे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. प्रमुख वक्ते व पाहुणे पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरचीचे उपप्राचार्य सुजय घाडगे होते.

चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे ६ विद्यार्थी इंडियन आर्मी, पोलिसमध्ये भरती झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील २३ प्राध्यापकांनी राष्ट्रीय, राज्य स्तरावर यश संपादन केले. पुरस्कार, पेटंट, लेखन याबद्दल उल्लेखनीय कामगिरी केलेल्यांचाही या निमित्त सत्कार करण्यात आला.



**रामानंदनगर : येथे. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलताना महेंद्र लाड.**

उपप्राचार्य सुजय घाडगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा क्षेत्रात यश संपादन करून स्वतःला आजच्या स्पर्धेच्या युगात सिद्ध केले पाहिजे. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

**जाहीर नोटीसीस
जाहीर उत्तरी नोटीस**

दि. १९/०३/२०२४ रोजीची ॲड. राजाराम बाळासाहेब साळुंखे, रा. सांगली यांची दै. पुढारीमधील जाहीर नोटीसीस उत्तरी नोटीस तसेच खरेदी घेणार यांना या उत्तरी नोटीसीने कळविणेत येते की

पुढारी



रामानंदनगर : येथील महाविद्यालयात वेशभूषा दिनानिमित्त वासुदेवाच्या वेशभूषेत विद्यार्थी.

# डॉ. कदम महाविद्यालयात वेशभूषा दिन उत्साहात

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात पारंपरिक वेशभूषा दिन उत्साहात झाला. भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे व विद्यार्थ्यांना त्याविषयी माहिती मिळावी या उद्देशाने महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने पारंपरिक वेशभूषा हा उपक्रम राबविण्यात आला.

यानिमित्ताने शेलापागोटेचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पारंपरिक वेशभूषा केली होती. महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. यू. व्ही. पाटील अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे संयोजन कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले यांनी केले.

या कार्यक्रमास आर्टस् विभागाचे उपप्राचार्य, डॉ. के. बी. भोसले व सायन्स विभागाच्या उपप्राचार्या डॉ. गौरी पाटील उपस्थित होते.

My Sangli Edition
Feb 5, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

दैनिक द वाळवा क्रांती

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगरमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न...

**दै. वाळवा क्रांती \ रामानंदनगर**

विद्यार्थ्यांनी आयुष्यात कोणतातरी एक खेळ तरी जोपासला पाहिजे व तो अंगीकृत केला पाहिजे त्यातून मुलांचा शारीरिक विकास, बौद्धिक विकास, मानसिक विकास घडेल असे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड यांनी व्यक्त केले. मुलांनी कोणाला तरी आपल्या जीवनात आदर्श मानून त्या दृष्टीने आदर्शवद अशी आपली वाटचाल करून यश संपादन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कोणत्याही क्षेत्रात आपला ठसा निर्माण करून त्या दृष्टीने वाटचाल केली पाहिजे आयुष्यात खेळाडूवृत्ती सर्वांनी जोपासली पाहिजे.



**रामानंदनगर येथाल डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड.**

रामानंदनगर येथाल डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते व पाहुणे सुजय घाडगे होते ते पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची येथे उपप्राचार्य या पदावर कार्यरत आहे.निसर्गात जे आहे ते आत्मसात केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा क्षेत्रात यश संपादन करून स्वतःला आजच्या स्पर्धेच्या युगात सिद्ध केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.चालू शैक्षणिक वर्षी २०२३ -२४ मध्ये महाविद्यालयाचे ६ विद्यार्थी इंडियन आर्मी, पोलीसमध्ये भरती झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयातील २३ प्राध्यापकांनी चालू शैक्षणिक वर्षी राष्ट्रीय, राज्य स्तरावर यश संपादन करून आपला ठसा उंचावलेला आहे. पुरस्कार, पेटंट, लेखन याबद्दल उल्लेखनीय कामगिरी केलेल्यांचाही या निमित्त सत्कार करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यु.व्ही. पाटील यांनी केले. कार्याध्यक्ष डॉ. पी. बी. पाटील यांनी अहवालाचे वाचन केले. लेफ्टनंट संदेश दौंडे, प्रा. अमोल जमदाडे, मुख्याध्यापिका एम. एस. मोरे , उपप्राचार्य डॉ.के.बी. भोसले, डॉ. गौरी पाटील ,सौ. पी. डी. पुदाले, सुपरवायझर एस. एस. खोत उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी यांचे वाचन प्रा. आशा मडावी, प्रा. नम्रता कांबळे यांनी केले, आभार प्रा.दिनेश ससाने यांनी मानले .सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम आणि प्रा. संजीवनी शिंदे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Sangli Edition
Mar 22, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

पुढारी

# डॉ. पतंगराव कदम यांचे कर्तृत्व प्रेरणादायी

## डॉ. संतोष माने यांचे मत; भारती विद्यापीठाचे नाव परदेशातही

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या व सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्रगती करून दाखविली आहे. दूरदृष्टी ठेवून अनेक धोरणात्मक निर्णय घेतल्यानेच भव्यदिव्य कार्य सांगली, पुणे, मुंबई, दिल्ली शहरांबरोबरच परदेशातही उभे राहिलेले आहे. स्वप्नांना सत्यात उतरवणारे डॉ. पतंगराव कदम यांचे कर्तृत्व नवीन पिढीला प्रेरणादायी आहे, असे मत डॉ. संतोष माने यांनी व्यक्त केले.



**रामानंदनगर : येथील डॉ. पतंगराव कदम जयंतीनिमित्त बोलताना डॉ. संतोष माने व उपस्थित.**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने डॉ. पतंगराव कदम यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत ते बोलत होते.

यावेळी प्र. प्राचार्या डॉ. यू. व्ही. पाटील, ज्येष्ठ नेते विश्वास पाटील, उपप्राचार्या प्रतिभा पुदाले, डॉ. अशोक खाडे उपस्थित होते.

विश्वास पाटील यांनी साहेबांचे अनुभव सांगून त्यांच्या कर्तृत्व व दातृत्वाचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी प्रा. स्वाती मगदूम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभागाचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. दिलीप कोने यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रा. सुनीता थोरबोले यांनी आभार मानले.

My Sangli Edition
Jan 16, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# डॉ. पतंगराव कदम यांच्यामुळेच विकास

## जे. के. (बापू) जाधव : डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

पलूस-कडेगाव मतदारसंघाचा कायापालट, विकास हा डॉ. पतंगराव कदम यांच्यामुळेच झाला आहे, असे मत रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जे. के. (बापू) जाधव यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात डॉ. कदम यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेतले, त्यावेळी ते बोलत होते. महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी काँग्रेस नेते महेंद्र लाड, प्राचार्या डॉ. यू. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. जी. आर. पाटील उपस्थित होते.



**रामानंदनगर : येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना जे. के. बापू जाधव व इतर.**

My Sangli Edition
Jan 9, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# डॉ. कदम महाविद्यालयात परिषद

■ **सकाळ वृत्तसेवा**

किर्लोस्करवाडी, ता. ६ : रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये गणितशास्त्र, वनस्पतीशास्त्र व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रिरिक्विजिट्स ऑफ रिसर्च पेपर इन हाय इम्पॅक्ट फॅक्टर जर्नल्स विषयाची एकदिवसीय परिषद झाली. रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड उद्‌घाटक होते. रयत शिक्षण संस्थेचे (सातारा) मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जे. के जाधव अध्यक्ष होते. प्रभारी प्राचार्य डॉ. उज्ज्वला पाटील यांनी स्वागत व प्रास्तविक केले. डॉ. दिनेश अमळनेरकर (तंत्रज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) बीजभाषक होते. डॉ. धनंजय सुतार (संचालक, बाळासाहेब खर्डेकर नॉलेज रिसोर्स सेंटर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) व डॉ. संतोष कांबळे (रमण पोस्ट डॉक्टरल फेलो (यू .एस. ए.), सहायक प्राध्यापक यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा) मार्गदर्शक होते. व्याख्यात्यांनी आजची नवीन संशोधन पद्धती, वाङ्मयचौर्य व हाय इम्पॅक्ट फॅक्टर जनरलमध्ये संशोधन पत्रिका लेखन यावर मार्गदर्शन केले. डॉ. लक्ष्मण वाघमारे (सहायक प्राध्यापक, अव्ययार शासकीय महिला महाविद्यालय, पुदुचेरी) अध्यक्ष होते. डॉ. परसू गावडे (राणी पार्वतीदेवी कला व वाणिज्य महाविद्यालय, बेळगाव) उपस्थित होते. प्राणिशास्त्र विभागप्रमुख अभिजित माने यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले अध्यक्ष होते. प्रभारी प्राचार्य डॉ. यू. व्ही. पाटील यांनी मार्गदर्शन केले.



**रामानंदनगर** : येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित परिषदेत बोलताना महेंद्र लाड.

पुढारी

# लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदान करा : लाड

## डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी उत्स्फूर्त व निर्भीडपणे मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय येथे पलूस तहसीलदार व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदाराची शपथ देण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

महाविद्यालयात रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. पलूस येथील नायब तहसीलदार विकी परदेशी उपस्थित होते. महाविद्यालयाने नवीन मतदार नोंदणीचे काम उत्कृष्टरीत्या केले आहे. लवकरच त्यांना पुरस्काराने सन्मानित केले जाईल, असे यावेळी मान्यवरांनी सांगितले. प्राचार्या डॉ. यू. व्ही. पाटील यांनी, तरुणांनी कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.



**रामानंदनगर : मतदार दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महेंद्र लाड, विकी परदेशी, यू. व्ही. पाटील, उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले.**

My Sangli Edition
Feb 3, 2024 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

पुढारी



रामानंदनगर : येथील महाविद्यालयात वेशभूषा दिनानिमित्त वासुदेवाच्या वेशभूषेत विद्यार्थी.

# डॉ. कदम महाविद्यालयात वेशभूषा दिन उत्साहात

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात पारंपरिक वेशभूषा दिन उत्साहात झाला. भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे व विद्यार्थ्यांना त्याविषयी माहिती मिळावी या उद्देशाने महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने पारंपरिक वेशभूषा हा उपक्रम राबविण्यात आला.

यानिमित्ताने शेलापागोटेचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पारंपरिक वेशभूषा केली होती. महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. यू. व्ही. पाटील अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे संयोजन कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य प्रा. पी. डी. पुदाले यांनी केले.

या कार्यक्रमास आर्टस् विभागाचे उपप्राचार्य, डॉ. के. बी. भोसले व सायन्स विभागाच्या उपप्राचार्या डॉ. गौरी पाटील उपस्थित होते.

My Sangli Edition
Feb 5, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in